# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एनजीपी/एआयर्सटीई फार्मसी/ मान्यता/२००८/ २३०

दिनांक : 27 2008

प्रति,

प्राचार्य,

श्रध्दा रुरल मेडिकल सोशल वेलफेयर

ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्ट द्वारा संचलित,

सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील

कॉलेज ऑफ फार्मसी, निघोज,

ता. पारनेर, जि. अहमदनगर ४१४ ३०६

विषय : शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून औषधनिर्माण पदविका अभ्यासक्रमांची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत..

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक मान्यता २००७/(११२/०७) तांशि ६, दिनांक २२.८.२००७

२. या कार्यालयाचे पत्र क्र. १०/ एनजीपी/ पदविका/ २००७/४८६, दि. ३०.८.२००७

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून खाली नमूद केलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिलेली होती. तथापी, सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये सुरु करणे शक्य झालेले नसल्यामुळे , अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून सुरु करणस क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तसेच खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून या संचालनालयाची परवानगी देण्यात येत आहे.

| अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|
| औषधनिर्माणशास्त्र पदविका | ६० |

शासनाने दिलेल्या परवानगीस अनुसरुन वरील पदविका संस्थेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची नियत ठेव म्हणून सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक व अध्यक्ष, श्रध्दा रुरल मेडिकल सोशल वेलफेयर ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्ट, निघोज यांच्या संयुक्त खात्यात स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पारनेर येथे प्रत्येकी रुपये ५.०० लाख याप्रमाणे एकूण रुपये १५.०० लाख पावती क्र. ८७२५७२, दि.२.६.२००८ अन्वये १० वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच वरील अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अध्यक्ष, श्रध्दा रुरल मेडिकल सोशल वेलफेयर ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्ट, निघोज यांच्या संयुक्त खात्यात स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पारनेर येथे रुपये ५.०० लाख पावती क्र. ८७२५७१, दि. २.६.२००८ अन्वये ५ वर्ष मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत व वरील अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षासाठी रुपये ५.०० लाख, इतक्या रकमेची ५ वर्षासाठी नियतठेव भरण्यात यावी. सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींचे पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रुपये १००/-च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून उपरोक्त नमूद केलेला अभ्यासक्रम सन २००८-०९ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

D:\SUMITA\order\diploma pharmacy order.doc



PRINCIPAL
Sahakar Maharshi Kisanrao Varal Patil
College of Pharmacy, Nighoj

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहिल.

३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक : टिईएम-३३८२/१११८३६/(१९०) तांशि १अ, दिनांक २१.५.१९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

४. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

७. संचालक किंवा या संचालनालयाचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याचा अधिकार राहील.

८. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना संस्थेचे निरीक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेत आढळून येणाऱ्या उणिवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण याच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधीत अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य, तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही. तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१२. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याच अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

( डॉ. सु.का. महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक यांना माहितीसाठी सादर.

३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.

४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, औरंगाबाद विभागीय कार्यालय,

५. कार्यासन क्रमांक ३, २अ , मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

६. निवड नस्ती.

D:\SUMITA\order\diploma pharmacy order doc

PRINCIPAL
Sahakar Maharshi Kisanrao Varal Patil
College of Pharmacy, Nighoj